# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.08.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>फडणवीस</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचं आज उद्घाटन करण्यात आलं. पुण्यासाठी आणखी ५ नवीन पोलीस स्थानकांना मान्यता देणार असल्याचं ते म्हणाले. पोलीसांसमोराची आव्हानं, कायदा आणि सुव्यवस्थेचे नवे प्रश्न लक्षात घेवून ६० वर्षानंतर पोलीस दलाचा नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. पुणे शहरासाठी लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, मांजरी, येवलेवाडी अशा पाच पोलीस स्टेशनची मागणी केली असून त्यास मंजुरी देण्यात येईल. त्यासाठी लागणाऱ्या एक हजार मनुष्यबळाला मान्यता देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. पुण्याचा वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी उपग्रहाचा उपयोग करून अत्याधुनिक एकात्मिक वाहतूक नियंत्रण प्रणाली उभारण्यात येणार आहे. आज उद्घाटन करण्यात आलेल्या चंदननगर पोलीस स्थानकाची इमारत सर्व सुविधांनी सुसज्ज अशी बांधण्यात आली आहे. पोलीसांना चांगली सुविधा मिळत असताना तक्रार घेवून आलेल्या नागरिकांना न्याय मिळावा यासाठी पोलिसांनी विशेष प्रयत्न करावे असं उप-मुख्यमंत्री अजित पवार याप्रसंगी म्हणाले.

**<u>कार्यशाळा</u>**

राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये योग्य संतुलन राखत महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हाच  मुख्य उद्देश आहे असं प्रतिपादन पायाभूत सुविधा विकास प्रकल्पासाठी पुण्यातील यशदा संस्थेत दोन दिवसांच्या कार्यशाळेचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं.  प्रत्येक अधिकाऱ्यानं आपल्या ज्ञानात सातत्यानं भर घालण्याचा आणि काम अधिकाधिक दर्जेदार करण्याचा निर्धार करावा, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी  व्यक्त केली.

**पवार**

पुणे जिल्ह्यात चाकण, हिंजवडी आणि उरळी देवाची-फुरसुंगी-मांजरी अशा तीन महापालिका केल्या जाणार आहेत, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज चाकण औद्योगिक क्षेत्रातील नागरी समस्यांची पाहणी केल्यानंतर केली. आपला निर्णय काहींना आवडणार नाही. मात्र, काळानुसार निर्णय घ्यावे लागतात, असंही ते म्हणाले.

**डीआयएटी**

जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडी आणि ऑपरेशन सिंदूर नंतर संरक्षण क्षेत्रात स्वदेशी शस्त्रं, उपकरणं आणि तंत्रज्ञानाची निकड अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी यांच्या वतीनं सेमीकंडक्टर चिप तंत्रज्ञान आणि डिफेन्स अँड स्पेस इलेक्ट्रॉनिक्स यांसारखे अत्याधुनिक अभ्यासक्रम लवकरच सुरू करण्यात येणार आहेत अशी माहिती संस्थेचे कुलगुरू डॉ. बी. एच. वी. एस. नारायणमूर्ती यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. संस्थेचा १८वा पदवी प्रदान कार्यक्रम उद्या होणार आहे. या कार्यक्रमात एम टेक, पीएचडी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना डीआरडीओचे प्रमुख समीर कामत यांच्या उपस्थितीत पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

डॉ. नारायणमूर्ती म्हणाले, डिफेन्स अँड एअरोस्पेस क्षेत्रातील तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेता, डीआयएटी नव्या अभ्यासक्रमांसह उद्योग-केंद्रित संशोधन आणि शैक्षणिक सहकार्य वाढवणार आहे. खासगी संरक्षण कंपन्यांनाही याचा मोठा लाभ होईल.

**फार्मोत्सव**

भारतात फार्मसी क्षेत्रातील बेरोजगारी वाढत असताना, विद्यार्थ्यांचं कौशल्य विकसित करूनच औषधनिर्मिती क्षेत्रात कुशल मनुष्यबळ तयार होईल असं मत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य विजय पाटील यांनी पुण्यात व्यक्त केलं. नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन आणि सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्यातर्फे आयोजित 'फार्मोत्सव २०२५' गौरव समारंभात ते बोलत होते. तंत्रशिक्षण मंडळात प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

**गणेश**

आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगानं पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं सार्वजनिक गणेश मंडळं, स्वयंसेवी संस्था, पर्यावरण प्रेमी यांची बैठक आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

आयुक्त सिंह यांनी बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना महापालिकेच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. यंदाच्या गणेशोत्सवात मूर्ती विसर्जनासाठी  महापालिकेनं कृत्रिम हौदांची संख्या १६ वरून ३२ वर नेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. शाडू मातीच्या मूर्तींसाठी विशेषतः १६ नवीन कृत्रिम हौद उभारले जाणार असून पीओपी मूर्तींसाठी स्वतंत्र हौदांची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे मूर्तींचं योग्य वर्गीकरण, पर्यावरणपूरक विसर्जन आणि सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. मूर्ती विक्रेत्यांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रणाली लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>ओलिंपिक</u>**

टोकियो ओलंपिक २०२१च्या स्पर्धेमध्ये भारताला ७ ऑगस्ट २०२१ या दिवशी नीरज चोप्रानं भारताला भालाफेकमध्ये सुवर्णपदक मिळवून दिलं होतं. या दिवसाचं औचित्य साधून भारतीय ॲथलेटिक्स महासंघानं ७ ऑगस्ट २०२२पासून हा दिवस राष्ट्रीय भालाफेक दिवस म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्याचा निर्णय घेतला.    या निमित्तानं द पुणे जिल्हा हौशी अथलेटिक्स संघटनेतर्फे  १६  आणि १८ या गटाची भालाफेक स्पर्धा आयोजित केली होती. .या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम , पदक आणि  प्राविण्य प्रमाणपत्र देण्यात आलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**